**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती  सभा क्रमांक :०६**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : १७/०२ /२०१६

प्रति,
मा. ----------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०६  शनिवार  दि. २० /२ /२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी  बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**शनिवार दिनांक   २० / २ /२०१६ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ६७ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०३ सोमवार दिनांक ०२/११/२०१५ व सभा क्रमांक-०४ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ६८ | अहमदनगर महानगरपालिकेचे वसंतटेकडी येथील पाण्याची बैठी टाकीचे दुरूस्ती सह नुतणीकरण करणे कामी प्राप्त झालेली मे.व्येकटेश कन्स्ट्रक्शन,श्रीरामपुर  यांची निविदा मंजूरी बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६९ | अहमदनगर महारनगरपालिका नेहरू मार्केट स.सं.२०८ या जागेमध्ये खाजगी विकसकाकडून FBT तत्वावर भाजी मार्केटसह व्यापारी संकूल विकसीत करणे करीता प्रिमियम रक्कम निश्‍चित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७० | अहमदनगर महानगरपालिका अर्जदार श्री.चेतन कुंदनमल गांधी यांचे अर्जानुसार गंजबाजार भाजी मार्केट मधील गाळे क्र.२ ते ५ व १६ ते  २० नांवावर करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७१ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल ) तसेच पंपचालक, विजतंत्री या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ७२ | अहमदनगर महानगरपालिकेचे फिरता दवाखाना आत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकरी यापदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची तांत्रीक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबातऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- ६७ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०३ सोमवार दिनांक ०२/११/२०१५ व सभा क्रमांक-०४ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- ६८ ते ७२ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०६**

विषय क्रमांक- ६७ शनिवार दि.२०/०२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०३ सोमवार दिनांक ०२/११/२०१५ व सभा क्रमांक-०४ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०३ सोमवार दिनांक ०२/११/२०१५ व सभा क्रमांक-०४ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०३ सोमवार दिनांक ०२/११/२०१५ व सभा क्रमांक-०४ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.बाबत विषय आहे.

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- दि.१२/१/२०१६ च्या सभे मध्ये कॉम्पॅक्टर,कंटेनर खरेदी चा विषय घेण्यात आला होता त्याचे काया झाले?

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- या बाबत ची फाईल कमीशनर साहेबांकडे आहे.अदयाप पर्यत फाईल आलेली नाही.

मा.सभापती साहेब :- माझ्या माहिती प्रमाणे या विषया बाबत विनानिविदा घेता येणार नाही.हरीत लवादाने ताशेरे ओढले आहेत.अशा अनेक गोष्टींचा विचार करून कंटेनर चा रेट हा काही वेगळा विषय नाही.बारेगेनिंग करून घ्या एवढेच बोललो होतो.या प्रमाणे खरेदी करता येत नसेल तर निविदा काढा.फक्त लवकरात लवकर कार्यवाही करा.तीन वर्षापासून पैसे पडून आहे.प्रोसेस लवकर पुर्ण करा.नाहीतर कचरा जो रस्त्यावर पडतो ते तुमच्या दालनामध्ये आणून टाकू.मी माझ्या स्वतःचे पैसे खर्च करून व लोकसहभागातून कचरा कुंडया तयारकरून माझ्या प्रभागात टाकल्या आहेत.पुढच्या सभेमध्ये या बाबत काय कार्यवाही झाली याची माहिती दया.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- प्रकरण ५ मधील नियम क्रमांक २(२) नुसार विना निवीदा खरेदी करावयाचे नसल्यास त्याचे ई - निविदा करा.सात दिवसांची अंतिम मुदत देवून कार्यवाही करा.

मा.सौ.छाया तिवारी :- ई - टेंडर लवकारात लवकर काढून कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब :- विनानिविदा खरेदी करता येत नसेल तर उपलब्ध्द निधी मधून खरेदी करण्यात यावी.सात दिवसांची अंतीम मुदत देवून ई - टेंडर काढण्यात यावे.व लवकरात लवकर खरेदी प्रक्रीया राबवावी.

**ठराव :-** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०३ सोमवार दिनांक ०२/११/२०१५ व सभा क्रमांक-०४ मंगळवार दिनांक १२/०१/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस हि सभा मान्यता देत आहे.तसेच दि.१२/१/२०१६ रोजी झालेल्या सभेतील ठराव क्र.४६ कचरा कंटेनर व कॉम्पॅक्टर खरेदी बाबत प्रकरण ५ मधील नियम क्रमांक २(२) नुसार विनानिविदा खरेदी करण्याचा ठराव केला होता.या नियमानुसार कार्यवाही करावयाची नसल्यास ई - निविदा मागवून खरेदी करण्यात यावी.व ई - निविदेची मुदत अल्प(सात दिवसांची) देण्यात यावी. सदर काम आरोग्याशी संबंधीत असल्याने या बाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.व केलेल्या कार्यवाही चा अहवाल पुढील सभेमध्ये देण्यात यावा.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही/-

अनुमादेक :- मा.सौ.छाया तिवारी सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-६**

विषय क्रमांक- ६८ शनिवार दि.२०/२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे वसंतटेकडी येथील पाण्याची बैठी टाकीचे दुरूस्तीसह नुतणी करण करणेकामी प्राप्त झालेली मे.व्येकटेश कन्स्ट्रक्शन,श्रीरामपुर यांची निविदा मंजूरीबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

संदर्भ :- १) ई - निविदा मंजूरी बाबत.
२) दि.१७/११/२०१५ व दि.०१/१२/२०१५ रोजीची छाननी समिती
३) मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांचे दि.२३/११/२०१५ चे वाटाघाटी बाबतचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की,दि.१७/११/२०१५ चे मा.छाननी समिती समोर ई निविदा क्र.१०४१ च्या प्राप्त तांत्रिक लिफाफयामधील सादर कागदपत्रे यथायोग्य आढळून आल्याने मा.छाननी समितीने व्यापारी लिफाफा उघणेस दिलेल्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे प्राप्त दोन निविदा उघण्यात आल्या.

१) मे.साई असोसिएटस,औरंगाबाद
२) व्यंकटेश कंन्स्ट्रक्शन,श्रीरामपुर

त्यानुसार दि.१७/११/२०१५ रोजी आर्थिक दराचा लिफाफा उघडला असता मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांचे ९.९९%इतका दर प्राप्त झालेला होता व मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन,श्रीरामपुर यांचे ४.९९%जादा दर प्राप्त झालेले होत.

या अनुषंगाने तुलनात्मक दृष्टया मे.साई कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे दरापेक्षा मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांचे दर सर्वात कमीचे म्हणजेच ४.९९% जादा दराचे आलेले असल्याने महानगरपालिकेचे अर्थिक हित लक्षात घेता मे.साई असोसिएटस,औरंगाबाद यांची निविदा ग्राहय धरण्यात आली.

तद्नंतर कमीचे निविदाधारक मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन,श्रीरामपूर यांनी निविदेत नमूद केलेले ४.९९%दर जास्तीचे वाटत असल्याने संबधीत निविदाधारक यांचेशी दर कमी करणेच्या दृष्टीकोनातून वाटाघाटी करण्यात आल्या.वाटाघाटी अंती कमीचे निविदाधारक मे.व्येकटेश कन्स्ट्रक्शन यांनी विषयांकित काम अंदाजपत्रकीय दराच्या २% जादा दराने काम करण्याची तयारी दर्शवून तसे लीखी पत्र दिले.

मा.छाननी समितीकडून विषयांकित कामी अंदाजपत्रकीय दराच्या२%जादा म्हणजेच रू.९३,३३,३७७/- इतकेच्या मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांचे दरास मान्यता मिळणेस शिफारस करण्यात आली आहे.

करिता मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन,श्रीरामपूर यांचे २% जादा म्हणजेच रू.९३,३३,३७७/- इतक्या दराच्या निविदादरास मा.स्थायी समितीची मंजूरी करिता प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि,अहवालानुसार मान्यतेस्तव सादर

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,शाखा अभियंता पाणीपुरवठा विभागप्रमुख यांचा अभिप्रायानुसर "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय कि,विभागाने प्रस्तावित केलेनुसार मान्सतेस्तव सादर,मा.स्थायी समिती समोर सादर करणेस्तव.

यावर मा.उपायुक्त (सा) यांची स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची संमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब **:-**अहमदनगर महानगरपालिकेचे वसंतटेकडी येथील पाण्याची बैठी टाकीचे दुरूस्तीसह नुतणी करण करणेकामी प्राप्त झालेली मे.व्येकटेश कन्स्ट्रक्शन,श्रीरामपुर यांची निविदा मंजूरीबाबत विषय आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- टाकीची दुरूस्त व नुतनीकरणा बाबत माहिती सांगा.

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- वसंत टेकडी येथील पाण्याच्या टाकीचा स्लॅब पुर्ण पणे पडला आहे.खालच्या टाकी वरील स्लॅब आहे.त्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहे.आपत्कालीन निधीमधून काम प्रस्तावित केले आहे.

मा.सभापती साहेब :- या टाकीचे दुरूस्तीचे काम करतांना शहराच्या पाणीपुरवठयावर काही परीणाम होईल का?

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- सदरचे काम हे टप्याटप्याने करणार आहे.पाणी पुरवठा विस्कळीत होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- देहरे येथील पाईपलाईन स्थलांतर बाबत पी.डब्लू.डी कडून पैसे येणार होते त्याचे काय झाले.?

मेकॅनिकल इंजि.श्री.निकम :- पी.डब्लू.डी कडून पैसे प्राप्त झाले असून प्रशासकीय मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे ठेवण्यात येत आहे.परंतु आपणास मी विनंती करीतो की,याला कालमर्यादा असल्याने याच सभेत या प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.

मा.सौ.छाया तिवारी :- ठिक आहे.प्रस्तावाची वाट न पहाता याच सभेमध्ये देहरे येथील रेल्वे भुयारी मार्गात/रस्त्यात बाधीत पाईपलाईन स्थलांतरीत करण्यास प्रशासकिय मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- टाकी बांधल्यापासून या टाकीची दुरूस्त झालेली नसल्याने या बाबत तात्काळ कारवाई करण्यात यावी तसेच देहरे येथील रेल्वे भुयारी मार्गात/रस्त्यात बाधीत पाईपलाईन स्तलांतरीत करण्यास प्रशासकिय मान्यता देण्यात यावी .

मा.सभापती साहेब :-ऑफिस रिपोर्ट नुसार टाकीचे बांधकाम झाले पासून आजतगायत म्हणजे अंदाजे ४० वर्षा पासून टाकीचे दुरूस्ती व नुतनीकरणाचे काम झालेले नाही.शहराच्या पाणी पुरवठयाच्या भविष्यातील दुष्टिकोनातुन विचार करता नुतनीकरण करणे अवश्यक असल्याने ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.तसेच कोपरगांव -अहमदनगर रा.मार्ग १०वरिल देहरे येथील रेल्वे भुयारी मार्गात/रस्त्यात बाधीत पाईपलाईन स्थलांतरीत करण्यास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे वसंतटेकडी येथील पाण्याची बैठी टाकीचे दुरूस्तीसह नुतनीकरण करणेकामी ऑफिस रिपोर्ट नुसार मा.छाननी समितीकडून शिफारस केल्यानुसार मे.व्यंकटेश कन्स्ट्रक्शन,श्रीरामपूर या निविदेस अंदाजपत्रकीय दराच्या२%जादा म्हणजेच रू.९३,३३,३७७/- इतकेच्या निविदादरास ही सभा मान्यता देत आहे.तसेच कोपरगांव -अहमदनगर रा.मार्ग १०वरिल देहरे येथील रेल्वे भुयारी मार्गात/रस्त्यात बाधीत पाईपलाईन स्थलांतरीत करण्यास प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.नियमानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमादेक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-६**

विषय क्रमांक- ६९ शनिवार दि.२०/२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महारनगरपालिका नेहरू मार्केट स.सं.२०८ या जागेमध्ये खाजगी विकसकाकडून FBT तत्वावर भाजी मार्केटसह व्यापारी संकूल विकसीत करणे करीता प्रिमियम रक्कम निश्चित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रकल्प विभाग.

संदर्भ :- १. मा.महासभा ठराव क्रमांक २ दिनांक ०५/०७/२०१४ अन्वये मंजूरी.

२. मा.नगर रचनाकार यांच्या कडून दिनांक ०९/०१/२०१६ रोजी मार्केट सिटी सर्व्हे २०८ या जागेची करण्यात आलेले मुल्यांकन.

सविनय सादर,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की,नेहरू मार्केट सिटी सर्व्हे नं.२०८ या ठिकाणी FBT या तत्वावर भाजी मंडईसह व्यापारी संकुल उभारणी संदर्भात ठराव पारीत करण्यात झाला आहे.सदर बाबत या पुर्वी FBT तत्वावर खाजगी विकासकाची नियुक्ती करणेकरीता तीन वेळा ई - निविदा मागविण्यात आली.परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही.

यापुर्वी मागविण्यात आलेल्या ई - निविदेमध्ये खालील प्रमाणे बाबींचा समावेश होता.

| अ.नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | ठेकेदाराने महानगरपालिकेस देय असलेली किमान प्रिमियम रक्कम. | २ कोटी |
| २ | चितळे रोड विकसित करणेसाठी महानगरपालिकेस देय असलेली रक्कम | ५० लक्ष |
| ३ | भाजी मार्केट मधील ७० ओटे महानगरपालिकेस बांधून देणे. | --- |
| ४ | ठेकेदाने महानगरपलिकेस देय असलेली Project Development Fee | २० लक्ष |
| ५ | Performance Security | एकुण प्रकल्प रक्कमेच्या ५ टक्के रक्कम अथवा रक्कम रू.३१,२०,०००/- जी रक्कम जास्त असेल ती. |

त्यानुसार मागविण्यात आलेल्या ई - निविदेस प्रतिसाद मिळाला नाही.तद्नंतर दिनांक १८/०३/२०१५ रोजी मा.आयुक्त यांचेकडेस नेहरू मार्केट विकसित करणेबाबत बैठक घेण्यात आली सदर बैठकीस मा.आयुक्त,मा.उपायुक्त(कर),शहर अभियंता व मा.नगर रचनाकार उपस्थित होते.

सदर बाबत मा.आयुक्त यांनी नगररचनाकार यांना या जागेची खाजगी Valuer यांचेकडून मुल्यांकन करून घेणेबाबत आदेशीत केले त्यानुसार नहरू मार्केट या जागेचे खाजगी Valuer यांच्याकडून मुल्यांकन करून घेणेबाबत कळविण्यात आले.खाजगी Valuer यांचेकडेस मुल्यांकन बाबत अनेक वेळेस पाठपुरावा करण्यात आला परंतु त्यांच्या कडून प्रतिसाद न मिळाल्याने मनपा नगररचनाकार विभागामार्फत जागेचे मुल्यांकन घेणेबाबत मा.आयुक्त यांनी दिनांक २७/१०/२०१५ रोजी आदेशीत केले.

सदर बाबत मा.नगर रचनाकार यांनी दिनांक ०९/०१/२०१६ रोजी नेहरू मार्केट सिटी सर्व्हे नं.२०८ या ठिकाणी असलेल्या एकुण १०६२.७० चौ.मी.या जागेची मुल्यांकन करून दिले असून मुल्यांकन रक्कम रू.२,११,५०,०००/- इतकी रक्कम निश्चित केली आहे.सदरची रक्कम ही जागेचे मुल्यांकन असून त्यावर किमान देय असलेली प्रिमियम रक्कम बाबत धोरण निश्चितसाठी मा.स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे.तद्नंतर नेहरू मार्केट FBT तत्वावर विकसीत करणे बाबत खाजगी एजन्सीची नियुक्ती करीता Expreeion of Interest मागविणे बाबत कार्यवाही करण्यात येईल.

नेहरू मार्केट सिटी सर्व्हे नं. २०८ या ठिकाणी एकुण १०६२.७०चौ.मीटर इतके क्षेत्रफळ असून सदर ठिकाणी दोन FSI असल्यामुळे एकुण अनुज्ञेय बांधकाम २१२५.४ चौ.मी.इतकी आहे.तरी नेहरू मार्केट सि.स.ने.२०८ या जागेचे प्रिमियम रक्कम निश्चित करणे बाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस सादर करणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रकल्प अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय कि,नहरू मार्केट सर्व्हे नं २०८ या एकूण १०६२.७० चौ.मी.या खुल्या जागेचे मा.नगररचनाकार यांनी रक्कम रू.२११.५०लक्ष इतके मुल्यांकन करून दिलेले आहे.सि.स.नं.२०८ या जागेचे प्रिमियम मुल्य निश्चित करणे ही बाब मा.स्थायी समितीचे अखत्यारीतील असलेने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१)प्रस्तुत प्रकरणी दि.१९/३/२०१५चे लेखापरिक्षण अभिप्राय कायम आहेत.,२)न.प.प्र.स./विकास कामे/२००५/प्र.क्र.२९२/३२दि.२८/११/२००५स्थायी निर्देशानुसार B.O.T.,खाजगी ,सार्वजनिक सहभागातून प्रकल्पाबाबत नगररचनाकार यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक ठरते त्यानुसार ते घेण्यात आल्याचे दिसून येते.,३)न.प.प्रशासन संचनालया स्थायी निर्देशक न.पा.प्र.स /१-६/नपा/२००४/९४४/कक्ष-७दि.२८/१०/२००४नुसार अधिमुल्य (प्रिमियम) हे नगरपालिकेने निश्चित केलेला वापर,अटी व शर्ती,दराच्या परीगणना तक्ता यांचा आधार घेवून निश्चित करणे आवश्यक ठरेल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,

१) संपूर्ण जागेची मोजणी नकाशा Site Plan मालकी हक्कचा उतारा ई.सोबत नाही.त्यामुळे आपण काढलेला नकाशा प्रमाणीत करून पहाता येत नाही.

२. एखादया मिळकतीचे Belting method नुसार Valuation कमी करणे विषयाच्या तरतूदी नेमक्या काय आहेत व त्या कधी वापराव्यात या विषययी च्या गाईडलाईन दाखवा.

३.सन २०१० च्या रेडीरेकनर नुसार बाजारमृल्य २.२४ कोटी व २०१५-१६ च्या रेडीरेकनर नुसार बाजारमृल्य २.११ कोटी रू.याचा नेमका खुलासा करावा.

४. माझे पुर्वीचे दि ९/३/१५ चे इतर आक्षेप कायम आहेत

५.IGR महाराष्ट्र यांचे मुल्यांकन विषयीच्या सुचनांसह सादर करावे खुलासा करावा.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय कि,प्रस्तुत प्रकरणी या कार्यालयाने दि.९/१/२०१६रोजी मुल्यांकन अहवाल सादर केलेला आहे.त्यानुसार सदरहु प्रकल्प अभियंता,अ.नगर मनपा यांनी मा.स्थायी समितीकडून प्रिमियम रक्कम निश्चित करून घेण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता.त्याबाबत मा.उपायुक्त (कर) मनपा यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा मुद्देनिहाय / फेर अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र.१ :-** सदरची जागा अहमदनगर शहर गावठाण हद्दीत समाविष्ठ असल्याने त्याची स्वतंत्र मोजणी करून घेणे आवश्यक नाही.त्याकरीता सि.स.नं.२०८ चा (एकत्रीकरणानंतरचा) नकाशा व एकत्रीकरणा पुर्वीचे नगरभुमापन आलेखाची प्रत सोबत जोडलेली आहे.त्या आधारे या कार्यालयाचे मुल्यांकन अहवालातील नकाशा प्रमाणीत करून घेणे आवश्यक असल्यास करण्यात यावे.


**मुद्दा क्र.२ :-** या कार्यालयाने सदरहू मिळतीचे मुल्यांकन (Belting method) या पध्दतीने करण्याची कारणमिमांसा मुल्यांकन अहवाल अलहिदा नमुद केलेली आहे.तसेच सदर मिळकतीचे मुल्यांकन (Belting method) ने करणेची बाब योग्य आहे किंवा कसे,याबाबत दि.२७/१/२०१६ रोजी मा.सहसंचालक,नगररचना,नाशिक विभाग, नाशिक यांचेशी समक्ष चर्चा केली असता,त्यांनी ही बाब योग्य असल्याचे मान्य केलेले आहे.तसेच याबाबत रोशन नामावटी यांचे Theory &Practice of Valuation या पुस्तकातील संबंधित पुष्ठांच्या छायाप्रती सोबत जोडलेल्या आहेत.

**माुद्दा क्र.३** कार्यालयाने यापुर्वी सदर जागेचा मुल्यांकन अहवाल दि.१२/२/२०१५ रोजी सादर केलेला होता.सदरहू मुल्यांकन अहवालाचे योग्यरित्या अवलोकन केल्यास यापुर्वीचा मुल्यांकन अहवाल देखील सन २०१०च्या बाजार मुल्य दर तक्त्यानुसार केलेला नसून तो सन २०१५च्या बाजार मुल्य दर तक्त्यानुसार केलेला असल्याची बाब निदर्शनास येईल. त्यामुळे हा मुद्दा सर्वस्वी अयोग्य आहे.

**मुद्दा क्र.४ :-** काहीही भाष्य नाही.

**मुद्दा क्र.५ :-** या कार्यालयाने दि.९/१/२०१६रोजी तयार केलेल्या मुल्यांकन अहवालातील प्रत्येक पट्टयातील जागेचे क्षेत्र ५०० चौ.मी.पेक्षा कमी आहे.त्यामुळे नोंदणी महानिरीक्षक यांनी बाजार मुल्य दर तक्त्यामध्ये दिलेल्या सुचनेनुसार १००% दर विचारात घेणे आवश्यक असून त्यानुसारच मुल्यांकन अहवालांत दर घेण्यात आलेला आहे.

**मुद्दा क्र.६** रोशन नामावटी यांचे वर नमुद पुस्तकातील (Belting method) बाबतच्या सुचना नुसार खालील प्रमाणे फेर मुल्यांकन अहवाल सादर करण्यात येत आहे.




| Belt No | Depth (mt) | Rate (Per sqm) | Area (sqm) | Valuation |
|---|---|---|---|---|
| 1 | 7.50 | 33710 | 194 | 194X33710=65,39,740 |
| 2 | 11.25 | 33710x2/3=22473 | 315 | 315x22473=70,78,995 |
| 3 | 16.875 | 33710x1/2=16855 | 553.70 | 500x16855=84,27,500<br>53.70x16855x0.90= 8,14,602 |
| | | **Total** | **1062.70** | **2,28,60,837** |

वरिल तक्त्यात नमुद केल्यानुसार सदरहू जमिनीचे मुल्य **रूपये २,२८,६०,८३७/-**समजा **रूपये २.२९ लक्ष** इतके येत आहे.तसेच या विभागाचे यापूर्वीचे मुल्यांकन अहवालातील शेवटच्या दोन परिच्छेदातील प्रिमीयम रक्कम निश्चित करणेबाबतचे अभिप्राय कायम आहेत.

तदवतच सादर करणेत येते की,या विभागाने केलेले मुल्यांकन प्रशासनास मान्य नसल्यास खाजगी मुल्यांकन तज्ञ अथवा सह जिल्हा निबंधक वर्ग १,अहमदनगर यांचेकडून मुल्यांकन करून घेण्याचा पर्याय उपलब्ध आहे./अ

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि, **(१)** यथाप्रस्तावित नुसार व गतपृष्ठावरील माझे दि.२१/१/१६ चे अभिप्राय पैकी मुद्दा क्र.५ चा खुलासा झालेला नाही., **(२)** दि९/३/१५ चे काही लागू मुद्दयांचा विचार करणेत यावा. , **(३)** उपरोक्त नमुद "क्ष" नुसार कार्यवाही करण्यास हरकत नाही., **(४)** नियमानुसार मे.स्थायी समिती प्रस्तावित Valuation व इतर अटी व शर्ती निश्चिती करीता पाठविणेस स.सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महारनगरपालिका नेहरू मार्केट स.सं.२०८ या जागेमध्ये खाजगी विकसकाकडून FBT तत्वावर भाजी मार्केटसह व्यापारी संकूल विकसीत करणे करीता प्रिमियम रक्कम निश्चित करणे बाबत विषय आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- प्रिमीयम ची रक्कम कमी होणार ही बातमी मी वर्तमान पत्रामध्ये गेल्या दोन तीन दिवसामध्ये मी रोज वाचतो आहे.या विषयाला कधी सुरूवात झाली या बाबत सविस्तर माहिती दया.नेहरू मार्केट कधी पाडले ते सांगा.

प्रकल्प विभाग श्री.मेहेत्रे :- सन २०१० मध्ये नेहरू मार्केट पाडले आहे.त्या ठिकाणी २०१० व नंतर ५ ते ६ वेळा निविदा मागविण्यात आल्या परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही.

मा.सभापती साहेब :- निविदेची रक्कम काय होती व शेवटच्या निविदेत प्रिमीयम ची रक्कम काय होती.

प्रकल्प विभाग श्री.मेहेत्रे :- स्थायी समितीने जागेचे मुल्यांकन ठरवले. नगररचना विभागाने २ कोटी १६ लाख मुल्यांकन ठरविले व चितळे रोड डेव्हलप करायचा असा ठराव केला.

मा.सभापती साहेब :- मुल्यांकन किती काढले.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :-पहिला ठराव २००१मध्ये झाला राज्य पातळीवरच्या निविदा मागवल्या मुल्यांकन २ कोटी काढले होते.स्थायी समितीकडे प्रिमीयम निश्चित करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता.शहर अभियांत्यांनी ५०लाख रू.चितळे रोड सुशोभिकरणासाठी ॲड केले.त्यास स्थायी समितीने मान्यता दिली.

मा.सभापती साहेब :- शहर अभियंता असे कसे ठरवू शकतो.वर्तमान पत्रामध्ये ४.५० कोटी प्रिमीयम होते असे आले आहे.सुरवातीस प्रिमीयम ची किंमत २ कोटी ५०लक्ष व चितळे रोड सुशोभिकरण.५०लक्ष हे कसे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- सुशोभिकरणासाठी रू.५० लाख अट टाकूण विकासकास वेठीस का धरता, आपला मुळ उददेश नेहरू मार्केट बांधणे हा असल्याने तेवढया करीताच निविदा काढा.विकासकाने विस्तापितांसाठी भाजी मार्केट मध्ये ओटे बांधायचे, पुर्वी च्या गाळे धारकांना प्राधान्याने दयायचे व

चितळे रोड सुशोभिकरण करीता ५० लाख  रककम खर्च करायचे  असे असल्यावर कितीही वेळा निविदा काढल्या तरी प्रतिसाद मिळणार नाही.कोणाला परवडणार आहे. किती ओटे दयायचे ? ७० ओटे कोठे देणार ७० भाजीवाले आहेत का? आपल्याकडे अधिकृत नोंदणी धारक ओटयावरील भाजी विक्रेते किती आहेत? माहीती सांगा.

मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :- भाजी विक्रेत्यांचे अधिकृत ५९ ओटे आहेत.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- आता किती भाजी विक्रेत्यांना ओटे देणार?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :-  अधिकृत भाजी विक्रेत्यांची संख्या ५९ आहे.रस्त्यावर मोठया प्रमाणात भाजी विक्रेते बसतात.त्यामुळे ७० ओटे प्रस्तावित आहेत.

मा.सभापती साहेब :- किती वेळा टेंडर मागविले.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :-  ७ ते ८ वेळा टेंडर काढले त्यास प्रतिसाद मिळत नाही.सन २००१ पासुनचा विषय आहे.राज्य स्तरावर निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर काही विकासकांनी जागा रिकामी करून देणे बाबत मागणी केली होती.त्यानुसार आपण मार्केट पाडण्याची कारवाई केली.त्यानंतर तेथील गाळेधारक कोर्टात गेले त्यामुळे कोर्ट मॅटर झाले.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेने बांधकाम करावे असा ठराव झालेला आहे का?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :-  FBT नुसार प्रतिसाद मिळाला नाही.त्यामुळे दि.५/७/२०१४ ठराव क्रमांक २ नुसार मा.महासभेमध्ये बजेटच्या सभेमध्ये महानगरपालिके मार्फत उपलब्ध निधी मधून काम करण्याचे ठरले परंतु म.न.पा.निधी उपलब्ध झाला नसल्याने नियोजन समिती मार्फत निधी प्राप्त करून काम करण्याचे ठरले.परंतु नियोजन समिती ने निधी देण्यास नकार दिला आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- संपुर्ण प्रकल्पाचा खर्च किती येईल ?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :-   नेहरू मार्केट ची जागा १०,५०० स्वे.फुट आहे.आत्ताच्या चालू दरा नुसार साधारण: ५ कोटी रूपयांचा खर्च अपेक्षीत आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- आपल्या कडे ५ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध आहे का? हा धोरणात्मक निर्णय आहे.FBT च्या माध्यमातुन करायाचे की मनपा मार्फत करावयाचे हे सर्व करण्याऐवजी प्रिमीयमची रक्कम जमीन मुल्याप्रमाणे म्हणजेच ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद रक्कम रूपये २,२८,६०,८३७/- प्रिमीयमची रक्कम निश्चित करावी. निविदा मागवाव्यात जर प्रतिसाद मिळाला नाही तर मनपा मार्फत बांधण्याचा निर्णय घेण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-  निधी अभावी आणखी दोन वर्ष वाट पहायची का ?

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- पुन्हा एकदा रिकॉल करण्यास हरकत नाही.२०१५ मध्ये जो प्रस्ताव सादर केला. रूपये २,२८,६०,८३७/- निश्चीत करणे योग्य होईल. व अनुषंगीक बाबी सुशोभिकरणाची अट वगळण्यात यावी.अशी माझी विनंती आहे.चितळे रोड सुशोभिकरण रू.५० लाख ही अट वगळण्यात यावी.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :-     जागेचे मृल्य २ कोटी २८ लाख असून प्रिमीयम ची रक्कम मा.स्थायी समितीला ठरवायची आहे.

मा.सभापती साहेब :- मागच्या वेळी २ कोटी व ५० लाख रूपये चितळे रोड  सुशोभिकरणासाठी ठेवले आहे.गेल्या १५ वर्षामध्ये जे भाडे  मिळायचे ते मिळाले नाही.टॅक्स मिळाला नाही.भाजीवाले रोडवर बसतात त्यांना हटविण्यासाठी जो खर्च होतो तो वेगळाच.

मा.उपायुक्त  साहेब (सा) :- कोर्टामध्ये जी कमीटमेंन्ट केली त्याचा समावेश करून टेंडर काढण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- छिंदम साहेब मा.उपायुक्त  साहेब (सा) जे बोलले आहेत त्यानुसार निवीदा मागवा. ५० लाख रूपयांचे चितळे रोड सुशोभिकरण चे कमी करण्यात यावे. रूपये २,२८,६०,८३७/-  प्रिमीयम करायला हरकत नाही.७ दिवसांत निविदा काढण्यात याव्यात.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- जळगांव  म.न.पा. धर्तीवर बांधण्यात आलेल्या मार्केट प्रमाणे बेसमेंट मध्ये भाजी विक्रेत्यांचे ओटे करता येतील का?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :-    हो  बेसमेंट मध्ये ओटे करता येईल.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- गाळे व ओटयाचे लोकेशन निश्‍चित करून दिले आहे का ?

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :-    तसे निश्‍चित करून दिले नाही.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- चितळे रोड सुशोभिकरणाचे ५० लाख रूपये कमी करून रूपये २,२८,६०,८३७/- प्रिमीयमची रक्कम निश्‍चित करण्यात यावी.

मा.सौ.छाया तिवारी :- फार दिवसांपासून हा विषय रेंगाळला असल्याने प्रिमीयमची रक्कम रूपये २,२८,६०,८३७/- निश्‍चित करून ७ दिवसांमध्ये निविदा मागविण्यात याव्यात.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महारनगरपालिका नेहरू मार्केट स.सं.२०८ या जागेमध्ये खाजगी विकसकाकडून FBT तत्वावर भाजी मार्केटसह व्यापारी संकूल विकसीत करणे करीता विकासकाने महानगरपालिकासाठी द्यावयाचे भाजीचे ओटयाचे व पुर्नवसन करावयाचे दुकान गाळे या बाबी विचारात घेता विकाकास हे क्षेत्र विकसित करावयाचे मुळ क्षेत्रातून कमी होईल याबाबी विचारात घेउन प्रिमियम रक्कम निश्‍चित करणे करीता झालेल्या चर्चे नुसार नेहरू मार्केट प्रिमीयम ची रक्कम रूपये २,२८,६०,८३७/- निश्‍चित करण्यात येत आहे.नव्याने व प्रस्तावामधील विकासकाने  चितळे रोड सुशोभिकरणासाठी रक्कम रूपये ५० लाख खर्च करणे बाबत ची अट घातली आहे ती रद्द करण्यात यावी.व ७ दिवसांमध्ये सदर कामाच्या निविदा काढण्या बाबत ची कार्यवाही पुर्ण करावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिका नेहरू मार्केट सि.स.२०८ या जागेमध्ये खाजगी विकसकाकडून FBT तत्वावर भाजी मार्केटसह व्यापारी संकूल विकसीत करणे करीता विकासकाने महानगरपालिकासाठी द्यावयाचे भाजीचे ओटयाचे व पुर्नवसन करावयाचे दुकान गाळे या बाबी विचारात घेता विकासकास हे क्षेत्र विकसित करावयाचे मुळ क्षेत्रातून कमी होईल. याबाबी विचारात घेउन प्रिमियम रक्कम रूपये २,२८,६०,८३७/- निश्‍चित करण्यास तसेच विकसकाने नव्याने विकसीत केल्या जाणा-या मार्केट च्या आराखडया नुसार गाळयांचे स्थान इमारती मध्ये व भाजी व्यावसाय करण्याकरीता ओटयांचे स्थान (बेसमेंन्ट)तळघरामध्ये निश्‍चीत करून  देण्यास ही सभा मान्यता देत आहे.तसेच ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद केल्या नुसार विकासकाने  चितळे रोड सुशोभिकरणासाठी रक्कम रूपये ५० लाख खर्च करणे बाबत ची अट रद्द करण्यात यावी व ७ दिवसांमध्ये सदर कामाच्या निविदा काढण्या बाबत ची कार्यवाही पुर्ण करावी. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम        सही /-

अनुमादेक :- मा.सौ. छाया तिवारी        सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ६**

विषय क्रमांक- ७० शनिवार दि.२०/०२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका अर्जदार श्री.चेतन कुंदनमल गांधी यांचे अर्जानुसार गंजबाजार भाजी मार्केट मधील गाळे क्र.२ ते ५ व १६ ते २० नांवावर करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

सादर,

विनंतीपुर्वक रिपोर्ट देण्यात येतो की,अर्जदार श्री.चेतन कुंदनमल गांधी यांनी त्यांचे वडील कै.कुंदनमल किसनदास गांधी यांचे दिनांक २७/२/२००४ रोजी निधन झाल्यामुळे मी त्यांचा मुलगा असल्याने गंजबाजार भाजी मार्केटमधील गाळे क्र.२ ते ५,१६ ते २० नांवावर करणेबाबत अर्ज केलेला आहे.अर्जासोबत फक्त मृत्युदाखला जोडलेला आहे.

श्री.गांधी यांना अर्जासोबत १) बहिण,भाउ,आई यांचे मा.दुय्यम निबंधक,अ.नगर यांच्याकडे केलेले प्रतिज्ञापत्र,संमतीपत्र जोडलेले आहे २)अंतर्गत सुधारणा करण्यांस म.न.पा.ची आगाउ परवानगी घेतली नाही ३)वारसपत्र,स्वतःचे प्रतिज्ञापत्र जोडलेले नाही ४)सदरचे गाळे आपल्या नांवावर होण्यापूर्वीच (दोन गाळे ) पोटभाडयाने दिलेले आहे.५) मुदत वाढ मिळणे बाबत अर्ज केलेला नाही.त्यामुळे गाळे मनपाने ताब्यात घेवून फेरनिविदा पध्दतीने का देण्यात येवू नये याबाबतचा खुलासा सांत दिवसांच्या आंत करावा.अन्यथा मनपाने गाळे ताब्यात घेईल असे जा.क्र./मार्केट/३२० दि.२४/३/२०१४ अन्वये कळविले होते.त्यांनी त्याबाबत अद्यापपर्यत काहीही खुलासा केलेला नाही.त्यानंतर पुन्हा जा.क्र./मार्केट/११३ दि.५/६/१५ अन्वये कागदपत्राची पुर्तता करण्याबाबत कळविले होते.

श्री.गांधी यांनी दि.२४/३/२०१४रोजी स्वतःचे आईचे मा.दुय्यम निबंधक,अ.नगर यांचे समक्ष केलेले संमतीपत्र,पतिज्ञापत्र व बहिणीचे मा.नोटरी पब्लिक समोर केलेले संमतीपत्र जोडले आहे.त्यावर त्यांच्या बहिणीची सही नाही.गाळे नांवावर होणेबाबत अर्ज केलेला आहे.त्यांचे बहिणीने मा.दुय्यम निबंधक अ.नगर यांचेसमोर संमतीपत्र करून दिलेले नाही.

कर निरीक्षक प्र.स.क्र.२म.न.पा.यांना सदर गाळयवर घरपट्टीची किती थकबाकी आहे.याबाबत इकडेस कळवावे असे जा.क्र.मार्केट /१६२ दि.२२/७/१५ अन्वये कळविले होते.त्यावर कर निरीक्षक प्र.स.क्र.२ मनपा यांनी श्री.कुंदनमल किसनदार गांधी यांच्या नांवाची नोंद आढळून येत नाही असे जा.क्र.शहर वसूली/३०दि.२२/७/१५ अन्वये इकडेस कळविले आहे.

मा.नगररचनाकार,मनपा यांनी दि.१८/२/२०१२, ७/५/२०१२, १९/१/२०१३, १९/५/१४, १७/६/१४, २०/९/१४, १८/९/१४, २४/११/१४ अन्वये मनपा व्यापारी संकुलातील गाळयांचे नवीन दरमहा भाडे,नविन अनामत रक्कम प्रमाणित करून देण्याबाबत कळविले होते.मा.नगररचनाकार यांनी जा.क्र.टीपी / ४२३०दि.२५/५/१५ अन्वये गंजबाजार भाजी मार्केट मधील गाळयांचे प्रति चौ.मी.करीता दरमहा भाडे रू.३८०/- व प्रति चौ.मी.करीता अनामत रक्कम रू.१८,९९२/-इतकी प्रमाणित करून दिलेली आहे.

खालीलप्रमाणे नवीन दरमहा भाडे,अनामत रक्कम होत आहे.

| गाळा क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. | प्रमाणित केलेले प्रति चौ.मी.करीता दरमहा भाडे | एकूण नवीन दरमहा भाडे | क्षेत्रफळ चौ.मी. | प्रमाणित केलेले प्रति चौ.मी.करीता अनामत रक्कम | एकूण नवीन अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **२X३ =४** | **५** | **६** | **५X६=७** |
| २ | ४.८४ | ३८०/- | १८३९/- | ४.८४ | १८,९९२/- | ९१,९२१/- |
| ३ | ४.८४ | ३८०/ | १८३९/ | ४.८४ | १८,९९२/ | ९१,९२१/ |
| ४ | ४.८४ | ३८०/ | १८३९/ | ४.८४ | १८,९९२/ | ९१,९२१/ |
| ५ | ८.८४ | ३८०/ | १८३९/ | ४.८४ | १८,९९२/ | ९१,९२१/ |
| १६ | ८.१७ | ३८०/ | ३१०५/- | ८.१७ | १८,९९२/ | १,५५,१६५/- |
| १७ | ४.८४ | ३८०/ | १८३९/ | ४.८४ | १८,९९२/ | ९१,९२१/ |
| १८ | ४.८४ | ३८०/ | १८३९/ | ४.८४ | १८,९९२/ | ९१,९२१/ |
| १९ | ५.११ | ३८०/ | १९४२/- | ५.११ | १८,९९२/ | ९७,०४९/- |
| २० | १०.२२ | ३८०/ | ३८८४/- | १०.२० | १८,९९२/ | १,९४,०९८/- |
| | एकुण | - | १९९६५/- | - | - | ९,९७,८३८/- |

तसेच गाळे हस्तांतरण फी रू.६०,०००/- प्रति गाळयास याप्रमाणे ९ गाळयांचे हस्तांतरण फी रू.५,४०,०००/- इतकी होत आहे.

तसेच श्री.गांधी यांनी पुर्वपरवानगी न घेता परस्पर अंतर्गत सुधारणा,फेरबदल केलेले आहे.म्हणून प्रतिगाळयास रू.२०,०००/- इतका दंड भरण्याबाबत जा.क्र.मार्केट /३३६ दि.१६/१/२०१५अन्वये कळविले होते.अद्यापपर्यत त्यांनी दंडाची एकूण रक्कम रू.१,८०,०००/- भरलेली नाही.

मा.महासभा ठ.क्र.२० दि.३१/८/२०१५अन्वये गाळे हस्तांतरण करण्याबाबत ठराव पारीत झालेला आहे.गाळे हस्तांतरणाचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर सादर करावा असे सदर ठरावात नमुद केलेले आहे. सदर ठरावानुसार मनपाचे विधी तज्ञ ॲड.प्रसन्ना जोशी यांना कायदेशीर अभिप्राय देण्याबाबत जा.क्र. मार्केट/२८६ दि.२४/९/२०१५अन्वये कळविले आहे.अद्यापपर्यत कायदेशीर अभिप्राय त्यांनी दिलेला नाही.

येणे प्रमाणे अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि, प्रस्तावितनुसार त्वरीत ॲड.जोशी मनपा विधीज्ञ यांचा अभिप्राय घेण्यात यावा व वरील दिल्यानुसार संबंधीतास कळवावे.

यावर मनपा विधिज्ञ श्री.प्रसन्ना जोशी यांचा अभिप्राय कि,प्रस्तुत प्रकरणात गाळयातील फंरबदल व दंडनियम वगळता हस्तांतरणाचे विषयात नुतन ठरावाचे अधिन राहून गाळे हस्तांतरण करणे कायदयान्वये शक्य होईल.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अभिप्राय कि,फेरसादर,प्रस्तुत प्रकरणात गाळयातील फेरबदल,दंडनियम वगळता हस्तांतरणाचे विषयात नुतन ठरावाचे अधिन राहून गाळे हस्तांतरण करणे कायदयाअन्वये शक्य होईल.असा अभिप्राय मनपा विधीसल्लागार श्री.जोशी प्रसन्ना यांनी दि.२२/१/१६ रोजी दिलेला आहे.

तरी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे गाळेधारक यांचे कडून दंडाची रक्कम,हस्तांतरण फी,अनामत रक्कम घेवून गाळे हस्तांतरीत बाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव मा.स्थायी समिती पुढे घेणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,यथाप्रस्तावित नुसार आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त साहेब यांचा अभिप्राय कि,उपरोक्त सविस्तर अहवालाप्रमाणे व अधिनियम तरतुदी अन्वये धोरणात्मक निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.चेतन कुंदनमल गांधी यांचे अर्जानुसार गंजबाजार भाजी मार्केट मधील गाळे क्र.२ ते ५ व १६ ते २० नांवावर करणेबाबत प्रस्ताव विषय आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.छाया तिवारी :- ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार श्री.चेतन कुंदनमल गांधी यांचे अर्जनुसार गंजबाजार भाजी मार्केट मधील गाळे क्र.२ ते ५ व १६ ते २० नांवावर करण्यास मंजूर देण्यात येत आहे.

**ठराव :-** अर्जदार श्री.चेतन कुंदनमल गांधी यांचे अर्जानुसार गंजबाजार भाजी मार्केट मधील गाळे क्र.२ ते ५ व १६ ते २० नांवावर करणे करीता ऑफिस रिपोर्ट व मा.महासभा ठराव क्र.२० दि.३१/८/२०१५ अन्वये तसेच मनपा विधीज्ञ यांचा अभिप्राय पाहता गाळेधारक यांचे कडून हस्तांतरण फी,अनामत रक्कम घेवून गाळे हस्तांतर करण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमादेक :- मा.सौ.छाया तिवारी सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ६**

विषय क्रमांक- ७१ शनिवार दि.२०/०२/२०१६

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल ) तसेच पंपचालक, विजतंत्री या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- १. श्री. प्रदीप सदाशिव ढगे ,२. श्री. राहुल सदाशिव गिते यांचा दिनांक ११/०१/२०१६ रोजीचे तसेच श्री.मनिष कैलास सोनवणे व इतर यांचे दिनांक १२/०१/२०१६ रोजीचे अर्ज.

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, १. श्री. प्रदीप सदाशिव ढगे ,२. श्री. राहुल सदाशिव गिते यांनी दिनांक ११/१/२०१६ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये आम्ही पाणीपुरवठा विभागामध्ये कनिष्ट अभियंता (मेकॅनिकल) या पदावर कार्यरत आहे. सध्या मुळानगर ते वसंत टेकडी जलवाहिनी देखभाल व दुरूस्ती तसेच मुळानगर, विळद, नागापूर येथील पंपीग मशिनरीचे कामे तसेच फेज-२ अंतर्गत कामे इत्यादी कामावर कार्यरत असुन करारबध्द नेमणूक दिनांक १२/०२/२०१६ रोजी संपुष्टात येणार आहे. तरी पाणी पुरवठा विभागामध्ये काम करण्याची इच्छा आहे. त्या अनुषंगाने सेवेत मुदतवाढ मिळावी. असे नमुद करून विनंती केलेली आहे.

तसेच श्री. मनिष कैलास सोनवणे व इतर ३ यांनी दिनांक १२/०१/२०१६ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये आम्ही पाणी पुरवठा विभागामध्ये पंपचालक व विजतंत्री या पदावर कार्यरत असुन आमची करारबध्द नेमणूक दिनांक १२/०२/२०१६ रोजी संपुष्टात येणार आहे. तरी आम्हाला पाणी पुरवठा विभागामध्ये काम करण्याची इच्छा आहे. करीता आम्हांला पुढील ६ महिन्याकरिता मुदतवाढ मिळावी असे नमुद करून विनंती केलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये जा.क्र. पाणीपुरवठा विभाग ५४८ दि.१/८/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभाग अतयावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) व ( सिव्हील) तसेच पंपचालक, विजतंत्री यापदी संबंधीतांचा जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक ३०६० दिनांक १३/८/२०१५ अन्वये व जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक ३०६१ दिनांक १/०८/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १३/०८/२०१५ पासून सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करून तद्नंतर संबंधीतांच्या सदरच्या मानधनावरील केलेल्या कालावधीतील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव हा जा.क्र.आस्था. वर्क. ८६ दिनांक १९/०८/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १४ दिनांक १४/१०/२०१५अन्वये ठराव पारित करून संबधितांच्या सदर केलेल्या कालावधतील मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) व ( सिव्हील) तसेच पंपचालक, विजतंत्री यापदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर संबंधीतांची करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | तातपुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राहुल सदाशिव गिते | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | २०,०००/- | ३०६० १३/०८/२०१५ | १३/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १२/०२/२०१६ |
| २ | प्रदिप सदाशिव ढगे | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | २०,०००/- | ३०६० १३/०८/२०१५ | १३/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १२/०२/२०१६ |
| ३ | अमृता म्हातारदेव खाडे | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | ३०६० १३/०८/२०१५ | १३/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १२/०२/२०१६ |
| ४ | मनिष कैलास सोनवणे | पंपचालक | ७,५००/- | ३०६१ १३/०८/२०१५ | १३/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १२/०२/२०१६ |
| ५ | राकेश गोरक्षनाथ तेलोरे | पंपचालक | ७,५००/- | ३०६१ १३/०८/२०१५ | १३/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १२/०२/२०१६ |
| ६ | खान जावेद रफिक | विजतंत्री | ७,५००/- | ३०६१ १३/०८/२०१५ | १३/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १२/०२/२०१६ |
| ७ | प्रसाद मुरलीधर हातवळणे | विजतंत्री | ७,५००/- | ३०६१ १३/०८/२०१५ | १३/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | १२/०२/२०१६ |

वरील तक्त्यामधील अनु.क्र. ३ अमृता म्हातारदेव खाडे हया सदर आदेशान्वये पाणी पुरवठा विभागामध्ये सद्यस्थितीमध्ये कार्यरत नाहीत. तसेच त्यांनी पुढील पुर्ननियुक्ती होणेबाबत विनंती अर्ज दिलेला नाही त्यामुळे ते पुढील पुर्ननियुक्तीसाठी इच्छुक असल्याचे दिसुन येत नाही.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभागाकरीता कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) व पंपचालक व विजतंत्री या पदांची मंजुर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिक) | १ | १ | ----------- |
| ३ | पंपचालक | १२ | ०३ | ०९ |
| ४ | विजतंत्री | १३ | ०७ | ०६ |
| | एकुण | २६ | ११ | १५ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यंत सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ तरतुद बाबतची छायंकित प्रत.)

सद्यस्थितीमध्ये संबंधीतांची जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक ३०६० दिनांक १३/८/२०१५ व जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक ३०६१ दिनांक १३/८/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवून दिनांक १३/८/२०१५ पासून सहा महिन्याकरीता केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्नेनेमणूकीची मुदत ही दिनांक १३/८/२०१५ पासून समाप्त होणार आहे.

दरम्यानच्या काळात संदिप प्रभाकर पुंड व इतर यांचे दिनांक ६/५/२०१५ रोजीच्या अर्जावरील मा. मॅकेनिकल इंजि. , पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग १४१ दिनांक ०६/५/२०१५ अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री, पंपचालक व जोडारी यापदांचे दरमहा मानधन रूपये ७,५००/- वरून रूपये ९,५००/- इतके करणे बाबतचा प्रस्ताव निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था.वर्क ४२ दिनांक २६/६/२०१५ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २० दिनांक १४/१०/२०१५ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री , जोडारी यापदांचे दरमहा मानधन रक्कम रू.७५००/- मध्ये रूपये १५००/- वाढ करून ९०००/- करणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजुर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत शहर व उपनगरामध्ये सद्यस्थितीमध्ये मा. केंद्र शासन व मा. महाराष्ट्र शासन यांचे अनुदानातून फेज-२ अंतर्गत नव्याने पाईप लाईन टाकणेचे कामे प्रगती पथावर असुन नागरिकांच्या पाणीवितरण दृष्टीकोनातून अत्यावश्यक सेवेची बाबी असल्यामुळे संबंधीतांच्या संदर्भिय विनंती अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र मनपा अधि.१९४९ मधील ५३ च्या तरतूदीनुसार मा.स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) तसेच पंपचालक, विजतंत्री यापदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांची त्यांची सहा महिन्याकरीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्नेनेमणूकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मा.स्थायी समिती ठराव क्र.२० दि.१४/१०/२०१५ च्या पारित मंजुर ठरावाच्या अनुषंगाने नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे खास बाब म्हणून निर्णय झाल्यास त्याकामी दरमहा रू.७६,०००/- व सहा महिन्याचा एकूण खर्च रू.४,५६,०००/-इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु. | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | राहुल सदाशिव गिते | कनिष्ठ अभियंता ( मेकॅनिकल) | २०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| २ | प्रदिप सदाशिव ढगे | कनिष्ठ अभियंता ( मेकॅनिकल) | २०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ३ | मनिष कैलास सोनवणे | पंपचालक | ९०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ४ | राकेश गोरक्षनाथ तेलोरे | पंपचालक | ९०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ५ | खान जावेद रफिक | विजतंत्री | ९०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ६ | प्रसाद मुरलीधर हातवळणे | विजतंत्री | ९०००/- | पाणी पुरवठा विभाग |

संबंधितांच्या संदर्भिय विनंती अर्जाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) तसेच पंपचालक, विजतंत्री या पदांवर वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधितांची त्यांची सहा महिन्याकरीता केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्नेनेमूणकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमूद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्ण याकरीता मा.स्थायी समिती कडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्यलेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

सोबत :- सदर कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार मानधनावर
करारबध्द पुर्ननियुक्ती आदेशाबाबतचा प्रारूप मसुदा

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

सन २०१५-२०१६
अंदाजत्रकीय तरतुद
लेखाशिर्ष - मानधन
एकुण तरतूद रू.१,००,००,०००/-
झालेला खर्च रू.५१,४८,६४४/-
(माहे डिसेंबर २०१५ पेड इन जानेवारी २०१६ पर्यत)
शिल्लक तरतूद - ४८,५१,३५६/-

यावर मा.प्र. सहाय्यक आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम (५३) अन्वये कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारित ) २०११ चे कलम ५३(३) प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समितीचे पुर्व मंजुरीकरिता मा. स्थायी समितीसमोर ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल ) तसेच पंपचालक, विजतंत्री या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे प्रस्ताव विषय आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल ) तसेच पंपचालक, विजतंत्री या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या पुढील सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजूरीस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमादेक :- मा.सौ.रूपाली वारे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- ६**

विषय क्रमांक- ७२ शनिवार दि.२०/०२/२०१६

**प्रस्तावाचा विषय** अहमदनगर महानगरपालिकेचे फिरता दवाखाना आत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकरी यापदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची तांत्रीक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ९२९ दिनांक ०४/०१/२०१६ अन्वयेचा प्रस्ताव.

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ९२९ दिनांक ०४/०१/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " जा.क्र.आस्थापना करारबध्द ३८२७ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये डॉ.श्री.सुरेश घोलप यांची वैद्यकीय अधिकारी , फिरता दवाखाना या पदावर करार पध्दतीने मानधनावर दिनांक १८/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता नेमणुक करण्यात आलेली होती.त्यांच्या नेमणुकीचा कालावधी दिनांक १७/०२/२०१६ रोजी संपत आहे.सदरच्या कालावधीमध्ये त्यांचे काम समाधानकारक आहे.त्यांनी पुढील कालावधीसाठी पुर्ननेमणुक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी त्यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देऊन दिनांक २०/२/२०१६ पासुन सहा महिन्या करीता वैद्यकीय अधिकारी कै.बा.दे.दवा.या पदावर पुर्ननेमणुक करणे शिफारस आहे. " असे नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

यापुर्वी मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ३७० दिनांक ०४/०७/२०१५ अन्वये व जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ५११ दिनांक २०/०८/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार संबधीतांची तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक ३८२७ दिनांक १४/०९/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १८/०८/२०१५ पासुन सहा महिन्या करीता दरमहा रु २०,०००/- या मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदर केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे इकडील जा. क्र. आस्था. वर्कशिट ११५ दिनांक १९ / ९ / २०१५ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्र. १७दि.१४ /१०/ २०१५अन्वये ठराव पारीत करुन सदर संबधितांच्या मानधनावरील केलेल्या कालावधीतील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवे करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | कार्यरत विभाग | कार्यरत वर्ष | सद्यस्थितीमधील तांत्रिक खंड देवुन जा.क्र. आस्था . करारबध्द नेम. व दि. | सद्यस्थिती मधील सहा महिने नियुक्ती कालावधी | दरमहा मानधन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सुरेश विलास घोलप | वैद्यकीय अधिकारी | कै.बा. दे.दवा. (फिरता दवा.) | दि.२८/८/२००९ पासुन वेळोवेळी सहा महिन्या करीता मानधना वर पुर्ननेमणुक | ३८२७ १४/०९/२०१५ | १८/८/१५ ते १७/२/१६ | २०,०००/- |

सदर वरील संबधीतांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक १८/२/२०१६ पासुन समाप्त होत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये फिरता दवाखान्या करीता वैद्यकीय अधिकारी असे पदनाम मंजुर नाही.

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यत सदर आकृतीबंधास मा. शासना कडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये **५३ :- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे** याबाबत नमुद केलेले आहे. (सोबत : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील - ५३ तरतुद बाबतची छायांकित प्रत.)

अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये वैद्यकीय अधिकारी असे पदनाम आस्थापना कायम सुचीवर मंजुर नाही , तथापि फिरत्या दवाखान्यामार्फत शहर व उपनगरामध्ये गरीब वस्तीमध्ये जाऊन रुग्णांना अल्प दरामध्ये आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देऊन साथीच्या रोगांवर नियत्रंण ठेवण्यात येत असल्यामुळे नागरीकांना आपातकालीन परिस्थितीमध्ये वेळेवर तातडीने आरोग्य सेवा देणे अत्यावश्यक सेवेची बाब आहे.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ९२९ दिनांक ०४/०१/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी संबधीतांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये २०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च १,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ९२९ दिनांक ०४/०१/२०१६ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची अटी व शर्ती नुसार सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना

तांत्रिक खंड देवुन दिनांक २०/२/२०१६ पासुन सहा महिन्या करीता रु २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता पाठविणे बाबत मंजुरीसाठी निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

सोबत :- सदर करारा प्रमाणे अटी व शर्ती नुसार मानधनावर
करारबध्दसाठी पुर्ननियुक्ती आदेशा बाबतचा प्रारूप मसुदा.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

**सन २०१५-२०१६**

अंदाज पत्रकीय तरतुद
लेखाशिर्ष - मानधन (ऑननरी डॉक्टर)
एकुण तरतुद रु . ७०,००,०००/-
झालेला खर्च रु. ५५,९३,६३१/-
( माहे डिसेंबर २०१५ पेड इन जाने.२०१६ पर्यत)
---------------------------------
शिल्लक तरतूद :- १४,०६,३६१/-

यावर मा.प्र. सहाय्यक आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम (५३) अन्वये कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारित ) २०११ चे कलम ५३ प्रमाणे रिक्त पदाचे अनुषंगाने कार्यवाही करणेस हरकत नसावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- फिरता दवाखाना आत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकरी यापदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची तांत्रीक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे प्रस्ताव विषय आहे.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.रूपाली वारे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.श्रीपाद छिंदम :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट नुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरता दवाखाना आत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकरी यापदी डॉ.सुरेश विलास घोलप यांची तांत्रीक खंड देवून दिनांक २०/२/२०१६ पासून अटी व शर्ती नुसार सहा महिन्या करीता रूपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजूरीस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.श्रीपाद छिंदम सही /-

अनुमादेक :- मा.सौ.रूपाली वारे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका